Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील कथनात्मक आणि विशिष्टार्थी भाषा : एक अभ्यास

**प्रा.डॉ. व्यंकट दि. कोरेबोईनवाड**
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रदान केलेल्या विद्रोह, विज्ञान आणि विश्वात्मक जाणिवेमुळे दलित कवितेचा जन्म झाल्याचे दिसून येते. १९६० नंतर उदयास आलेल्या दलित कवितेने सर्वप्रथम समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था तसेच अर्थव्यवस्थेमधील आपल्यावर लादलेल्या गुलामीचा शोध घेतला. या शोधातून त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुध्द विद्रोह, नकार पुकारला. १९८९ मध्ये प्रकाशित झालेला नामदेव ढसाळ यांचा 'तुही यत्ता कंची? तुही यत्ता' हा कवितासंग्रह काव्य निर्मितीचे सर्व संकेत मोडीत काढून धर्म, रुढी, परंपरेविरुध्द संताप व्यक्त करतो. या कवितासंग्रहातील भाषेतून मानवी मूल्याची प्रतिष्ठापणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

१९६०-८० या कालखंडातील दलित कवितेला कथनात्मकतेचे जे भाषिक रुप लाभले आहे, ते तिच्या जाणिवेतून प्राप्त झालेले आहे. नामदेव ढसाळ यांच्या कवितेत जीवनासंदर्भातील घटनांची, घटितांची मांडणी होत असल्याने या कवितेची अभिव्यक्ती कथनात्मक पध्दतीची असल्याचे दिसून येते.

''तिला म्हटलं, घरातल्या सैतानाबद्दल लिहिले आणि तेच तिला जमलं नाही आणि सैतानावरच पाळी झाली आहे. माइंड, सोल, बॉडी सरेंडर करण्याची गळ्यात क्रुस घालण्याची.'' (सैतानाबद्दल, पृष्ठ २३)

''हे, शब्दांनो, या ना इथे विश्रांतीला पायांना चक्रे बांधून चिकार वणवण केलीत जस याही धडधडणाऱ्या हृदयाला पाहून घ्या ना जरा याही पुत्रवती वृक्षाच्या छायेत बसून घ्या ना जरा याही धमणीचा रिदम ऐकून घ्या ना कदाचित तुमच्या वांझ गर्भाशयाला पालवी फुटेल.'' (जनरल वॉर्ड, पृष्ठ ६५)

''पोर तान्हे टाकुनीया कुठे गेली माय त्याची? घर उघडे वाघडे सर थांबे पावसाची, सारा संसार फुटका उतरंड गाडग्यांची गळतीला असे नाद, वाण टोप - भगुल्यांची' ' (पावसाचे गाणे, पृष्ठ ४६)

ढसाळांच्या कवितेमध्ये जशी विद्रोही भाषा दिसते, तशीच कथनात्मक भाषाही अधिक प्राबल्याने दिसून येते. सर्वसामान्य माणसाच्या व्यथा-वेदना-आक्रोश-क्षोभ व्यक्त करणे हेच दलित कवितेचे ध्येय आहे. ही व्यथा-वेदना निखळ भावनेच्या पातळीवर अभिव्यक्त होण्यापेक्षा मानवी शोषणमुक्तीच्या चिंतनातून या कवितेने कथनात्मक भाषा स्वीकारली आहे यासंदर्भात प्रभाकर मांडे म्हणतात, ''दलित साहित्याच्या निर्मात्याची वाङ्‌मय कलावंताची केव्हाही नसते. त्याची भूमिका एका जीवनदृष्टीने भारली गेल्यामुळे, एका जीवनमध्ये याचा अंगीकार केल्यामुळे आणि सामाजिक परिवर्तनाला उद्‌युक्त झाल्यामुळे मिशनरी वृत्तीच्या समाजकार्यकर्त्यांची असते. साहित्य हे त्याच्या दृष्टीने समाजक्रांतीचे शस्त्र असते.''

मानवी जगण्यामध्ये कथनात्मकता असते. कथनामध्ये घटना, प्रसंगाची क्रमवार रचना असते. नामदेव ढसाळांच्या कवितेनेही आपल्या शोषित पीडीत समूहाच्या जगण्याचे कथन केले आहे. त्यातून त्याच्या जगण्यातील सर्व घटना-प्रसंगांची मांडणी कार्यकारणभावानुसार व्यक्त झाली आहे. त्याचबरोबर कथनात्मकतेचे वैशिष्ट्ये सहजता आणि सुलभता हे होय. यानुसार त्यांच्या कवितेने आपल्या प्रतिमांना सहजता आणि सुलभतेने अभिव्यक्तीनिष्ठ केले आहे. कथनातील ही सहजता अत्यंत संवेदनशील भाषेत व्यक्त झाली असल्यामुळे तिला प्रत्ययकारीपणा प्राप्त झाला आहे. या कथनात्मकतेत संवेदनशीलतेला महत्त्व असल्यामुळे इथे वस्तुनिष्ठतेला महत्त्व ठरले नाही. एकूणच वास्तववादी जीवनसंदर्भाच्या अपरिहार्य मागणीतून ढसाळांच्या कवितेने कथनात्मक भाषिक रुप धारण केल्याचे आढळून येते.

दुसरे असे की, ढसाळांच्या भाषेने विशिष्टार्थी भाषेचे रुपही धारण केल्याचे आढळून येते.

''थू : त्या ईश्वराच्या मायला !
एकदा तरी भडव्याने मुंगसासारखे तोंड दाखवायला हवे होते !'' (त्यांनी ईश्वराला हाकारले, पृष्ठ ५८)

''कॅलेंडरला हेपलून
कित्येक शतकांचा उपदंश देहावर मढवून
निशाचर साळिंदर पहुडलंय इथं
दिसतं कसं लोभस करडया गुच्छासारखं
स्वप्नातच अविरत दंग दंग' ' (कामाठीपुरा, पृष्ठ ७५)

ढोल / गवार / शुद्र / नाही
सन ताडन के अधिकारी
हे सन्त फॉकलंड रोडा,

''ही आमुच्या आयुष्याची वेळ तुझ्या डोळयात दडलेली हा अमुचा वेदनेचा चेहरा तू असा पुन्हा पुन्हा वर का आणतोयस?'' (संत फॉकलंड रोड, पृष्ठ ८१)

''हे स्वातंत्र्या, तुझ्या रांडेला वाझ ठेवू नको
तिला आमच्या खाली निजू दे
तिची कूस उजवू दे
हे स्वातंत्र्या,
हे दगडा,
हे बुळक्या, हे शेंदराच्या मालका
फक्त एका नियोगाची मला संधी दे !'' (स्वातंत्र्या, पृष्ठ ९५)

दलित कवितेच्या अशा भाषेसंदर्भात डॉ. संजय मून म्हणतात, शोषित-पीडीत अशा माणसांच्या जगण्यातून घडलेल्या भाषा भांडवलाची कथात्मक पध्दतीने रचना करीत, विशिष्टार्थापासून तर व्यंग्यार्थापर्यंतच्या शक्यता पूर्ण करीत, जीवनाचा आशय व्यक्त करणारी भाषा ही दलित कवितेची भाषिक व्यवस्था होय. तर डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, प्रस्थापित साहित्यात जाणीवपूर्वक सुसंस्कृत शब्दयोजना करुन वा उच्च सभ्यता सांभाळल्याचे दर्शविले जाते, पण त्यामुळेच ते सामान्य बोलीभाषेच्या रसरशीत जिवंतपणाला मुकते. नव्या प्रवाहाला प्रतिरोधक ठरते. दलित साहित्यात् कधी निर्माण होणारे अनौचित्यही मायबोलीतील शब्दसामर्थ्यांमुळे शेवटी एक औचित्य मूल्यच बनते. अशा प्रकारे नामदेव ढसाळांच्या भाषेत वेदना, भय, विद्रोह, बीभत्सता, संताप, नकार या सर्व जाणिवेंचा भावनातिरेक ठासून भरलेला दिसून येतो. एकूणच ढसाळांच्या या भाषेला अश्लील म्हणता येणार नाही. कारण व्युत्पत्तीच्या अंगाने अश्लील शब्दाचा अर्थ सौंदर्याचा अनुभव न देणारे असा होतो. परंतु ढसाळांच्या कवितेतील ही शिवराळ भाषा सौंदर्यांचा निखळ अनुभव देणारी आहे. म्हणूनच ती विशिष्टार्थी आहे.

सारांश, नामदेव ढसाळांच्या प्रस्तुत कवितासंग्रहातील भाषा ही शोषणमुक्तीच्या चिंतनातून आली आहे. त्यामुळे ही कविता जेव्हा दलितांच्या जीवनातील व्यथा-वेदना, आक्रोश इत्यादी घटना प्रसंगाची कार्यकारणभावानुसार मांडणी करते तेव्हा ती कथनात्मक भाषेचे रुप धारण करते. तसेच सदभिरुची, सुसंस्कृतीच्या नावाखाली ढसाळांच्या कवितेच्या भाषेला अभद्र, शिवराळ, हीन म्हणता येणार नाही तर ही भाषा दलितांच्या जगण्यातील वास्तवातून आल्यामुळे ती विशिष्टार्थाने सौंदर्याचा निखळ अनुभव देणारी असल्याचे अभ्यासाअंती दिसून येते.

**संदर्भग्रंथ :**

१. नामदेव ढसाळ - 'तुही यत्ता कंची? तुही यत्ता' , शब्द पब्लिकेशन मुंबई, तिसरी आ. २०१४.

२. प्रभाकर मांडे - 'दलित साहित्याचे वेगळेपण' , धारा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आ. १९७९

३. डॉ. संजय मून - 'शैली : दलित कवितेची' , गोदा प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००९.

४. योगेंद्र मेश्राम - 'दलित साहित्य : उद्गम आणि विकास' , श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०११.